**TARUN BHARAT**

कोकण, गोव्यासह सीमाभागातील जनतेचे मुखपत्र

तरुण भारत

06.11.2017

# डीएमईआरच्या कारवाईला डॉक्टरांचा विरोध

## परवाने रद्द करण्याच्या निर्णयाला डॉक्टर आव्हान देणार

**मुंबई :** पदवी घेतल्यानंतर एक वर्षासाठी ग्रामीण भागात काम न केलेल्या राज्यातील डॉक्टरांवर वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालयाने (डीएमईआर) केलेल्या दंडात्मक कारवाईला आता डॉक्टरांकडून विरोध सुरू झाला आहे. ग्रामीण भागात काम करण्याची डॉक्टरांची तयारी असूनही इच्छुक डॉक्टरांना पोस्टिंगच मिळत नसल्याचे डॉक्टरांकडून सांगण्यात येत आहे. या सर्व अवैध कारवाई विरोधात डॉक्टरांची 'बीईंग डॉक्टर्स' संघटना लढण्याच्या तयारीत असल्याचे वातावरण निर्माण झाले आहे.

डीएमईआरकडून ज्या डॉक्टरांचे प्रमाणपत्र रद्द करण्यात आले त्यांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार, २ कोटी रुपयांपर्यंतच्या दंडाची शिक्षा सुनावली.

> **डॉक्टर स्वेच्छेने या बॉण्डवर सह्या करतात. मग ते सेवा देण्यास का टाळाटाळ करतील. ग्रामीण भागात कुठेही ते जाण्यास तयार असतात. मात्र, डॉक्टरांचा परीक्षेंचा निकाल जाहीर झाल्यानंतर त्यांना ठराविक काळात या बॉण्डनुसार ग्रामीण भागात तैनात करावे असे सरकारी अध्यादेशात म्हटले आहे. यात डॉक्टरांची काहीही चूक नाही.**
>
> **डॉ. दीपक चतुर्वेदी, अध्यक्ष, बीईंग डॉक्टर्स संघटना**

अशा डॉक्टरांच्या बाजूने ही संघटना उतरली आहे. मुळात डॉक्टरांवरील अशाप्रकारची कारवाई अत्यंत कठोर असून संचालनालयच डॉक्टरांना पोस्टिंग देण्याकडे दुर्लक्ष करत असल्याचे मत ही संघटना व्यक्त करत आहे. 'बीईंग डॉक्टर्स' ही संस्था या दंडात्मक कारवाईचा विरोध करत असून डीएमईआरने याबाबत फेरविचार करावा, असे आवाहन करत आहे. चांगल्या योजनांची अंमलबजावणी सरकारकडून योग्य

प्रकारे झाली नाही. पायाभूत सुविधेचा अभाव, डॉक्टरांच्या क्षमता आणि कौशल्यानुसार त्यांच्या पोस्टिंगची ठिकाणे निश्चित करण्यात येणारी असमर्थता यामुळे या योजनेची अंमलबजावणी अपयशी ठरली असल्याचे 'बीईंग डॉक्टर्स' संस्थेचे पदाधिकारी डॉक्टर सांगतात.